(सोबत:- अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारास सेवानिवृत्त/मृत्यूनंतर भविष्य निर्वाह निधी खात्यातील रकमेचे अंतिम प्रदान करणेबाबत सर्व विभागांना सूचना... शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-भनिनि ११२१/१०/प्र.क्र.३/१३-अ, दि.२८ जानेवारी २०२१ ची प्रत)

---

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:- संकीर्ण -२०२१/(प्र.क्र. ३३ /२०२१) आ (क्षेप्र)

जलसंपदा विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- १०.०३.२०२१

प्रति,

महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक
सर्व कार्यकारी संचालक,
जसंविच्या अधिपत्याखालील सर्व मुख्य अभियंता
जसंविच्या अधिपत्याखालील सर्व परिमंडळीय अधीक्षक अभियंता

आपणांस कळविण्यात येते की, सदरहू शासन पत्र आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून सदर पत्रातील सूचनांचे तंतोतंत पालन करण्याच्या सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात. सदर शासन पत्रातील सुचनांनुसार पुढील योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, ही विनंती.

(शोभना कदम)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

सहपत्र:- वरीलप्रमाणे

प्रत:- १. कक्ष अधिकारी, आ(वर्ग-१), आ(वर्ग-२), आ(तांत्रिक), आ(अतांत्रिक), आ(शा.अ.), आ(श्रेणी-२), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-४००० ३२ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

२. आ(क्षेप्र) संग्रहार्थ.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा रोड , हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,विस्तार दालन क्रमांक-६२५ मुंबई .४०००३२

दूरध्वनी क्र:-०२२-२२७९३२०८ Email ID-- desk13a.gad-mah@gov.in

**क्रमांक** : भनिनि ११२१/१०/प्र.क्र.३/१३-अ
दिनांक : २८ जानेवारी,२०२१.

**प्रति,**

**अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,**
**सर्व मंत्रालयीन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**विषय :** अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारास सेवानिवृत्त /मृत्यूनंतर भविष्य निर्वाह निधी खात्यातील रकमेचे अंतिम प्रदान करणेबाबत सर्व विभागांना सूचना...

**महोदय,**

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९९८ मधील नियम ४ नुसार, महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेले सर्व स्थायी शासकीय कर्मचारी, एक वर्षाची अखंड सेवा पूर्ण केलेले सर्व अस्थाई शासकीय कर्मचारी व पुन्हा सेवेत घेतलेले सर्व निवृत्तीवेतनधारी हे महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे वर्गणीदार असतात. या नियमातील नियम २९ च्या तरतुदीनुसार वर्गणीदारास त्याच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा असलेली रक्कम त्याच्या नियत सेवानिवृत्तीच्या दिनांकानंतरच्या दिनांकास देय होते.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक २१ डिसेंबर,२०१९ अनुसार ज्या अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्या आहेत, अशा महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे वर्गणीदार असलेल्या अधिसंख्य अधिकारी / कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती अथवा मृत्यूनंतर त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यातील रकमेचे अंतिम प्रदान किंवा भविष्य निर्वाह निधीमधील परतावा / ना परतावा रकमांचे प्रदान नियमित शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच करण्यास प्रत्यवाय नाही. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम,१९९८ मधील नियमांतील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची असल्याने, यासंदर्भात विभागांनी आपल्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रीय कार्यालयांना कृपया सूचित करावे, ही विनंती.

आपली

(रोहिणी भालेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) संचालक,लेखा व कोषागारे संचालनालय,ठाकरसी हाऊस,३ रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, शुरजी वल्लभदास मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई.
२) निवडनस्ती.

C:\Users\rajashri.piknaik.MAHAGOV\Desktop\Smita K\smita 2021\Letter sent to other dept\भनिनि\प्रक 3-2-अधिसंख्य पदावर वर्ग अधिकारी-भनिनि बाबत सर्वसाधारण सूचना.docx